**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
**गणेशखिंड, पुणे**

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7

---

१८ एप्रिल २०१९

# पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रवेश आता ऑनलाईन प्रवेशपरीक्षेद्वारे

## विद्यापीठातील अभ्यासक्रमांबाबत महत्वाचा निर्णय

पुणे-

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमध्ये चालविण्यात येणाऱ्या पदव्युत्तर आणि पदवीच्या सर्व अभ्यासक्रमांसाठी आता ऑनलाईन प्रवेशपरीक्षा घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. प्रवेशांमध्ये तसेच इतर शैक्षणिक प्रक्रियांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून या परीक्षा घेण्यात येणार आहेत. पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे प्रवेश मात्र संबंधित विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या ऑफलाईन प्रवेश परीक्षेद्वारे देण्यात येतील.

विद्यापीठ परिसरातील विविध विभाग आणि केंद्रामध्ये मिळून ८० पेक्षा जास्त पदव्युत्तर आणि पदवी अभ्यासक्रम चालविते जातात. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून या सर्व अभ्यासक्रमांमध्ये फक्त प्रवेश परीक्षेच्या माध्यमातूनच प्रवेश दिले जातील. त्यातील बहुतांश अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा फक्त ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. त्याखेरीज विद्यापीठातील विविध विभागांमध्ये मिळून सुमारे ७० पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविले जातात. संबंधित विभागांमध्ये होणाऱ्या परीक्षेद्वारे या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिले जातील. या वर्षी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात घेतली जाईल. ऑनलाईन प्रवेश अर्ज तसेच प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाचे उपकुलसचिव श्री. उत्तम चव्हाण यांनी दिली.

ही ऑनलाईन प्रवेश परीक्षा महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये तसेच देशातील काही प्रमुख महानगरांमध्ये घेतली जाईल. त्यामुळे विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेचा विस्तार तर होईलच, शिवाय विद्यार्थ्यांनाही त्यांच्या जवळच्या वा सोयीच्या शहरामध्ये परीक्षा देणे शक्य होईल. ऑनलाईन प्रक्रियेमुळे अर्ज दाखल करण्यापासून ते अभ्यासक्रम व वसतिगृहामध्ये प्रवेश मिळण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेचे सुसुत्रीकरण होईल.

ही ऑनलाईन प्रवेश परीक्षा बहुपर्यायी स्वरुपाची असेल. त्यामध्ये दोन विभाग असतील. पहिल्या २० गुणांच्या विभागामध्ये तर्क, आकलन व सर्वसाधारण अध्ययनकल यासंबंधी प्रश्न असतील तर दुसऱ्या

८० गुणांच्या विभागामध्ये संबंधित विषयाच्या ज्ञानावर आधारीत प्रश्न असतील.

ऑनलाईन प्रवेश अर्ज, अर्हता निकष, प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक, प्रवेश परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम यासंबंधीची सविस्तर माहिती लवकरच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unipune.ac.in) प्रसिद्ध करण्यात येईल.

विद्यापीठातील पीएचडी आणि एमफिलसाठीची प्रवेश प्रक्रियाही जूनमध्येच घेण्यात येणार आहे, असेही श्री. चव्हाण यांनी सांगितले.

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com